॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ९ जून : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्या परिषदेची बैठक कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक ९ जून रोजी संपन्न झाली. या बैठकीत स्थानिक उद्योगांना पूरक ठरणारे अभ्यासक्रम, अभ्यासक्रमासोबतच प्रात्यक्षिक व्यवस्था व अभ्यासक्रमासोबत उद्योगात काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणाऱ्या नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देण्यात आली. तसेच अधिकारप्रादत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या पदवी प्रमाणपत्र बाबतही निर्णय घेण्यात आला.

यावेळी प्र. कुलगुरू प्रा एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विविध विद्या शाखांचे अधिष्ठाता, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, प्रशाळा संचालक, अध्यापक व इतर शिक्षण तज्ञ उपस्थित होते.

आजच्या बैठकीत विद्यापीठाच्या वाणिज्य प्रशाळेंतर्गत एम. कॉम. इन्डस्ट्री इन्टीग्रेटेड ॲप्लाईड अकौन्टींग ॲण्ड टॅक्सेसन हा अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सकाळ सत्रात विद्यार्थ्यांना वर्गात शिक्षण मिळणार असून दुपार सत्रात सी. ए. लॅब प्रात्यक्षिक म्हणून विद्यार्थ्यांना सनदी लेखापाल यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे.

या बैठकीत रसायन शास्त्र प्रशाळे अंतर्गत "एम. एससी. केमिस्ट्री स्पेशलायझेशन इन रबर टेक्नॉलॉजी" या नवीन व सद्यस्थितीत मागणी असलेल्या अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथम वर्ष अभ्यासक्रम विद्यापीठात पूर्ण केल्यानंतर द्वितीय वर्षाकरिता विद्यार्थ्यांना ठाणे येथील इंडियन रबर मटेरियल इन्स्टिट्यूट या संस्थेत प्रत्यक्ष एक वर्ष काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

याच बैठकीत केळी या स्थानिक उद्योगाचा विचार करून विद्यापीठ सल्लागार समितीने सुचवल्यानुसार 'सर्टिफिकेट इन बनाना एक्सपोर्ट मॅनेजमेंट' हा दोन क्रेडिटचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विशेष म्हणजे या अभ्यासक्रमामुळे जळगाव येथून निर्यात होणाऱ्या केळी पिकाला निर्यातक्षम बनविण्यासाठी व तांत्रिकदृष्ट्या व्यवस्थापन होण्यास मदत मिळेल. या अभ्यासक्रमाचे पात्रता केवळ दहावी उत्तीर्ण असल्याने सामान्य शेतकरी व स्थानिक युवकांना रोजगाराची संधी विद्यापीठाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.

या बैठकीत वरील विषयांसह विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अधिकारप्रादत्त स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयांमधून पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रांवर संबंधित अधिकारप्रादत्त स्वायत्त महाविद्यालयाच्या नावासोबत लोगो व विद्यापीठाचाही लोगो छापण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्वायत्त महाविद्यालयांची स्वतंत्र ओळख कायम राहणार असून, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांवर विद्यापीठाची अधिकृत मान्यता आणि संलग्नता स्पष्टपणे अधोरेखित होणार आहे. त्यामुळे पदवी प्रमाणपत्रांची विश्वासार्हता आणि शैक्षणिक मूल्य अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

आजच्या बैठकीत वरील विषयांसह महाविद्यालयांचे संलग्निकरण मान्य करणे, संशोधन केंद्रांना मान्यता दिली याशिवाय विविध बाबींवर चर्चा होऊन विद्यापीठाच्या गुणवत्ता वाढी संदर्भात देखील महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. सर्व सदस्यांनी या सभेत सहभाग नोंदविला.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ९ जून, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता